## मेट्रो स्थानकांच्या नावांसाठी धाव!

**मुंबई :** 'पुढील स्थानक, एलआयसी किंवा इंडियन ऑईल किंवा ओबेरॉय - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' अशी उद्घोषणा मेट्रो ३ च्या प्रवासामध्ये ऐकायला मिळाली तर नवल वाटू नये. कारण मेट्रो ३ मार्गिकेवरील १८ स्थानकांच्या नाम अधिकार हक्कांसाठी ८७ स्वारस्य अर्ज मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे आले आहेत. विविध २८ नामांकित सार्वजनिक प्रकल्प, बँका, आर्थिक संस्था आणि ब्रॅण्ड मेट्रो ३ च्या नाम अधिकार हक्कासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे मेट्रो ३ च्या तिकीट भाडेव्यतिरिक्त महसुलात चांगलीच वाढ होऊ शकते.

वृत्त...३

# मेट्रो स्थानकांच्या नावांसाठी धाव!

### नाम अधिकार हक्कांसाठी ८७ स्वारस्य अर्ज; वांद्रे-कुर्ला स्थानकास सर्वाधिक पसंती

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** 'पुढील स्थानक, एलआयसी किंवा इंडियन ऑईल किंवा ओबेरॉय - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' अशी उद्घोषणा मेट्रो ३ च्या प्रवासामध्ये ऐकायला मिळाली तर नवल वाटू नये. कारण मेट्रो ३ मार्गिकेवरील १८ स्थानकांच्या नाम अधिकार हक्कांसाठी ८७ स्वारस्य अर्ज मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे आले आहेत. विविध २८ नामांकित सार्वजनिक प्रकल्प, बँका, आर्थिक संस्था आणि ब्रॅण्ड मेट्रो ३ च्या नाम अधिकार हक्कासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे मेट्रो ३ च्या तिकीट भाडेव्यतिरिक्त महसुलात चांगलीच वाढ होऊ शकते.

#### स्थानकानुसार स्वारस्य अर्ज

- शहरातील अत्यंत महत्त्वाचे व्यापारी केंद्र असलेल्या वांद्रे-कुर्ला संकुल स्थानकासाठी सर्वाधिक १२.
- दादर व आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानकांसाठी प्रत्येकी ९
- स्थानिक विमानतळ व सीएसएमटी स्थानकांकरिता प्रत्येकी ७

#### स्वारस्य दाखवणाऱ्या संस्था

- सार्वजनिक उपक्रम : एलआयसी, इंडियन ऑईल
- बँक, आर्थिक संस्था : स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, यू.टी.आय., कोटक, आयडीएफसी फर्स्ट, एचएसबीसी.
- विमान कंपनी : इंडिगो, स्पाईसजेट
- कॉर्पोरेट कंपनी : जेएसडब्लू, ग्लॅक्सो स्मिथ क्लाईन, टाइम्स समूह, ब्लॅकस्टोन, फिनिक्स मिल्स, पिरामल, ओबेरॉय, डी.बी. रिअल्टी

'मेट्रो ३' मार्गावरील स्थानकांच्या नाम हक्क अधिकारासाठी एमएमआरसीएलला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. कुलाबा ते सीप्झ या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गिकेवर एकूण २७ स्थानके आहेत. या स्थानकांच्या नाम हक्क अधिकारासाठी एमएमआरसीएलने निविदा मागविल्या होत्या. त्यापैकी १८ स्थानकांसाठी ८७ स्वारस्य अर्ज प्राप्त झाले आहेत. मार्चमध्ये या स्वारस्य अर्जांवर निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. 'तिकीट भाडेव्यतिरिक्त मिळणारा महसूल कुठल्याही वाहतूक व्यवस्थेच्या शाश्वत कार्यान्वयनासाठी अतिशय महत्त्वाचा असतो. यामुळे तिकिटाचे दर नियंत्रणात ठेवणे शक्य होते. स्थानकांच्या नाम अधिकाराद्वारे मिळणारा महसूल महत्त्वाचा स्रोत असेल. विविध नामांकित कंपन्यांद्वारे यासाठी मिळालेला प्रतिसाद उत्साह वाढवणारा असल्याचे, एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी सांगितले. तसेच याद्वारे ब्रॅण्डसनादेखील फायदा होणार असून मेट्रो ३ सारख्या महत्त्वपूर्ण मेट्रो मार्गिकेसोबत त्यांचे नाव जोडले जाईल असेही देओल म्हणाले.

घाटकोपर ते वर्सोवा या मेट्रो १ मार्गिकेवर काही स्थानकांचे नाम अधिकार हक्क देण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गिकेवर 'पुढील स्थानक - बँक ऑफ बरोडा, अंधेरी' अशी उद्घोषणा प्रवाशांना ऐकायला मिळते. 'मेट्रो ३' स्थानकांच्या उद्घोषणादेखील भविष्यात अशाच होऊ शकतात.